महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

क्र.मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉटनं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ६२८ दिनांक ०९/०८/२०२१

**विषय : निवड आणि बिगर निवड (Selection &Non-Selection) पदांवरील पदोन्नतीसाठी गोपनीय अहवाल मुल्यांकन विहीत करण्याबाबत.**

**संदर्भ:** प्रशासकीय परिपत्रक क्र.२५६ दि. ३०.१०.२००९.

महावितरण कंपनी अंतर्गत निवड आणि बिगर निवड (Selection &Non-Selection) पदांवरील पदोन्नतीसाठी प्रशासकीय परिपत्रक क्र.२५६ दि.३०.१०.२००९ अन्वये किमान गोपनीय अहवाल मुल्यांकनाची मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण कपंनीमध्ये पदोन्तीकरीता विचारात घेण्यात येणारे गोपनीय अहवाल मुल्यांकनाचे निकष एकसमान असावे या उद्देशाने मराविमं, सुत्रधारी कंपनीकडून अभ्यास समितीची स्थापना करण्यात आली होती. अभ्यास समितीने दिलेला अहवाल आणि मराविमं, सुत्रधारी कंपनीकडून मंडळ ठराव क्र.९४५/२०२१ दि.०६.०५.२०२१ प्राप्त सूचनांच्या आधारे, महावितरण कंपनी अंतर्गत पदोन्तीसाठी गोपनीय अहवाल मुल्यांकनाचे निकष सुधारीत करण्याची बाब व्यवस्थापनाच्या विचाराधीन होती.

२. आता, संचालक मंडळाने ठराव क्र. २३६० दि. ०५.०८.२०२१ अन्वये दिलेल्या मंजुरीनुसार निवड पदांवरील (Slection Posts) पदोन्नतीसाठी प्रशासकीय परिपत्रक क्र.२५६ दि. ३०.१०.२००९ अन्वये विहीत केलेल्या गोपनीय अहवाल मुल्यांकनाच्या निकषांमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | गोपनीय अहवाल किमान मुल्यांकन | |
|---|---|---|---|
| | | सद्यस्थितीतील | सुधारीत |
| १ | कार्यकारी संचालक | २२ | २१ |
| २ | मुख्य अभियंता आणि समकक्ष | २१ | २० |
| ३ | महाव्यवस्थापक आणि समकक्ष | २० | १९ |
| ४ | अधीक्षक अभियंता आणि समकक्ष | १९ | १८ |
| ५ | सह.महाव्यवस्थापक/कार्यकारी अभियंता आणि समकक्ष | १८ | १७ |
| ६ | वेतनगट क्र. १ व २ मधील इतर सर्व अधिकारी | १८ | १७ |
| ७ | वेतनगट क्र.३ (राज्यसेवा जेष्ठते मधील) | १८ | १७ |

**टिप** : मागासवर्गीय कर्मचा-यांना खुल्या प्रवर्गातील पदोन्नतीकरीता उपरोक्त गोपनीय अहवाल किमान मुल्यांकनामध्ये १ गुणाची सवलत असेल.

३. निवड पदावरील पदोन्तीसाठी विहीत करण्यात आलेले सुधारीत गोपनीय अहवाल निकष सदरचे प्रशासकिय परिपत्रकाच्या दिनांकापासुन लागू राहतील.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(अ.म.भादीकर)
**कार्यकारी संचालक(मासं)**

**प्रत सविनय सादर :**
१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

**प्रत सस्नेह रवाना :**
१) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत रवाना :**
१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
७) मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.